# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १७०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.०३ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## राज्यातील १४ जिल्ह्यांना ऑरेंज, उर्वरित भागाला यलो अलर्ट

पुणे दि.२ (प्रतिनिधी)- राज्याला पुढील तीन दिवसांत म्हणजे, शुक्रवार (दि.३) ते रविवार (दि. ५ जुलै) पर्यंत जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ठाणे, रायगड, पुणे-सातारा घाटमाथा या भागांत रेड अलर्ट (अतिवृष्टी)चा इशारा दिला आहे, तर १४ जिल्ह्यांना मुसळधारेचा ऑरेंज अलर्टचा इशारा दिला आहे.

गत २४ तासांत मुंबईसह कोकणात अतिवृष्टीची नोंद झाली, तर उर्वरित भागात हलका ते मध्यम पावसाची नोंद झाली. राज्याच्या बहुतांश भागात हलका, पण संततधार पाऊस सुरू आहे. दरम्यान, शुक्रवार (दि.३) ते रविवार (दि.५ जुलै) दरम्यान ठाणे, रायगड जिल्ह्यासह पुणे घाटमाथा आणि सातारा घाटमाथ्याला रेड अलर्ट दिला आहे. हवामान विभागाने आज विदर्भातील अनेक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केले आहे. पूर्व विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर तर पश्चिम विदर्भातील अमरावती आणि अकोला जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केले आहे. त्यामुळे आज विदर्भातील बहुतांशी भागांमध्ये सर्वदूर मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल अशी शक्यता आहे.

# ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक’ विधानसभेत मंजूर

## परराज्यातील शेत मजूर महिलांना शेतकरी दर्जा नाही; कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे स्पष्टीकरण

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- शेती आणि संलग्न कार्यात सहभागी असलेल्या महिलांना महिला शेतकरी म्हणून मान्यता देणारे ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक’ गुरुवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. शेतीच नव्हे तर पशुपालन, मत्स्यपालन, कुकुटपालन तसेच इतर शेती संलग्न व्यवसायात असलेल्या महिलांना या विधेयकामुळे शेतकरी दर्जा मिळणार आहे. महिलेच्या नावावर सातबारा नसला तरी त्यांना शेतकरी प्रमाणपत्र दिले जाणार असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी स्पष्ट केले.

कृषी मंत्री भरणे यांनी बुधवारीच बहुचर्चित ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक’ विधानसभेत मंजुरीसाठी सादर केले होते. आज त्यांनी या विधेयकाचा हेतू आणि उद्देश स्पष्ट केला. शेतजमीन महिलांच्या नावावर करणे हा विधेयकाचा उद्देश नाही. तर कृषी क्षेत्र अथवा शेतीशी संबंधित क्षेत्रात ज्या महिला काम करतात त्यांना स्वत:ची शेतकरी म्हणून ओळख मिळावी हा उद्देश असल्याचे भरणे यांनी यावेळी सांगितले.

हे केवळ शेतकरी प्रमाणपत्र नसेल तर महिला शेतकऱ्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचा उद्देश या विधेयकाचा आहे. १५ ते २० टक्क्यांपेक्षा कमी महिल ांची नावे सातबारावर आहेत. त्यामुळे सातबारावर ज्यांची नावे नाहीत अशांनाही आता शेतकरी म्हणून दर्जा आणि अधिकार या विधेयकामुळे मिळेल. याशिवाय महिलांना राज्याच्या आणि केंद्राच्या कृषी विभागाच्या योजनांचा ल ाभ मिळणार असल्याचे भरणे यांनी सांगितले.

दत्तात्रय भरणे म्हणाले, जवळपास सर्वच सदस्यांचा या विधेयकाला पाठिंबा होता. महिला शेतकरीला न्याय मिळावा, एखादे धोरण राबवताना त्रुटी राहू नये, ही आमच्या सर्व सदस्यांची भावना होती. महिलांना शेतकरी प्रमाणपत्र दिले, तर सातबारा नावावर करणार का? असा प्रश्न काहींना मांडला. या विधेयकात शेती संकल्पनेची व्याख्या अतिशय व्यापक आणि सर्व समावेशक करण्यात आली आहे. नुसते शेतीच्या सातबाऱ्याबरोबर नाही, पीक उत्पादनासोबत महिला पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मासेपालन, मधमाशी पालन, वनकोष संकलन अशा उपजीविकेच्या साधनाचा व्यवसाय करते, परंतु हा व्यवसाय करताना तिच्या नावावर सातबारा नसतो. त्यामुळे तिला महिला शेतकरी म्हणून प्रमाणपत्र देणे सरकारचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे या विधेयकात उलेख केलेला आहे. कुठल्या महिलेच्या नावावर सातबारा करण्याचा आमचा उद्देश नाहीये.

आमचा उद्देश एकच आहे की, कृषी क्षेत्राशी संलग्न ज्या शेतमजूर महिला काम करतात, त्यांना शेतकरी म्हणून एक प्रमाणपत्र आणि त्यांची शेतकरी म्हणून ओळख निर्माण करणे हा आमचा खरा उद्देश आहे.

या विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या जयंत पाटील यांनी शेतकरी पतीच्या नावावरील ५० टक्के शेतजमीन महिलांच्या नावे करण्याची मागणी केली. विधेयकाच्या माध्यमातून महिलांची फसवणूक करू नका. सात-बारावर महिलांची नावे नोंद करा. कर्ज देताना वित्तीय संस्था महिला शेतकऱ्यांना विनातारण कर्ज देणार आहेत का? महिला शेतकऱ्यांकडून काय तारण घेणार याचा खुलासा करा? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले.

आपल्या राज्यात शेतकरी होण्यासाठी किमान अर्धा एकर जमीन असली पाहिजे, असा कायदा आहे, त्यामुळे महिलांच्या नावावर जोवर अर्धा एकर शेती नसेल तर त्यांना शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. ज्या महिलांना शेतकरी दर्जा देणार आहात, त्यांना अर्धा एकर जमीन कशी देणार, असा मुद्दा शिवसेना ठाकरे गटाच्या भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. दरम्यान, या विधेयकावरील चर्चेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ. शिवसेना ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे आदींनी भाग घेतला.

# माहिती अधिकार कायद्यातील बदलांना स्थगिती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पुढाकार, अण्णा हजारेंच्या मागण्यांची दखल

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- राज्य माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या अत्यंत वादग्रस्त बदलांना अखेर राज्य सरकारने तूर्तास स्थगिती दिली आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी या बदलांविरोधात पुकारलेल्या आंदोलनाची आणि मागण्यांची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट पुढाकार घेतला. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला पाठवलेल्या पत्राची दखल घेत, मुख्य माहिती आयुक्तांनी हे बदल स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे माहिती अधिकार क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि अण्णा हजारे यांच्या लढ्याला मोठे यश आले आहे.

अण्णा हजारे उपोषणावर ठाम राहिल्याने अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या विषयात मध्यस्थी केली. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला थेट एक पत्र पाठवले. या पत्रामध्ये त्यांनी स्पष्ट नमूद केले की, ‘‘ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्याशी या संदर्भात सविस्तर चर्चा केल्याशिवाय माहिती अधिकार कायद्यात कोणताही बदल किंवा निर्णय घेणे उचित ठरणार नाही.’’ मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या महत्त्वाच्या विनंतीनंतर आणि त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे राज्य मुख्य माहिती आयोगाने १२ जून रोजी राजपत्रात प्रकाशित केलेल्या सर्व बदलांना स्थगिती दिली आहे.

दरम्यान, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देखील फडणवीस सरकारला उपोषणाचा इशारा दिला होता. शासनाने १२ जून रोजी माहिती अधिकार कायदा २००५ संदर्भात सुधारित अधिसूचना जारी केली आहे. मात्र, त्यास सामाजिक संघटनांनी विरोध दर्शवला आहे. या कायद्यानुसार आतापर्यंत माहिती अधिकार कायद्याचा वापर करून माहिती मागवताना होणारा १० रुपयाचा खर्च होता, मात्र आता तो खर्च ३० रुपयांवर गेला आहे. यासोबतच प्रथम अपील ५० रुपये तर दुसऱ्या अपिलासाठी शंभर रुपये शासनाकडे जमा करावे लागणार आहेत.

मिळालेल्या माहितीसाठी प्रतिपान दोन रुपयावरून प्रतिपान पाच रुपये इतकं शुल्क संबंधित विभागाकडून आकारला जाणार आहे. या नियमासह एकूण १२ नियम करण्यात आले आहेत. या नियमांमुळे सामान्य नागरिकांना माहिती मिळवणं अशक्य होणार आहे. माहिती अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, पैसे कमावण्याचं साधन नाही. काही लोक याचा गैरफायदा घेतात, त्यामुळे शुल्क आकारणं गरजेचे आहे. मात्र, यातून पैसे कमावणे हा उद्देश नसावा असं अण्णांनी म्हटलं होतं. फडणवीस सरकारने केलेले बदल पुन्हा पूर्ववत केले नाही, तर आपण उपोषण करणार असल्याचं देखील अण्णा हजारे यांनी म्हटलं होतं.

## मुंबईत मॅनहोलमध्ये पडून एकाचा मृत्यू; शिवसेना आक्रमक

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मुंबईत कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामध्ये एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. मुंबईतील साकीनाका परिसरात एका २५ फूट खोल उघड्या मॅनहोलमध्ये पडल्याने ५५ वर्षीय अस्लम शेख या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर मुंबईत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून, राजकीय वातावरणही चांगलंच तापलं आहे. या निष्काळजीपणाला थेट मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे जबाबदार असल्याचा आरोप करत उपमहापौर संजय घाडी यांनी त्यांच्या राजीनाम्याची थेट मागणी केली आहे.

साकीनाका येथील खैरानी रोडवर गुरुवारी सकाळी १० च्या सुमारास ही घटना घडली. एका खाजगी कंत्राटदाराकडून देखभालीचे काम सुरू असताना मॅनहोलचे झाकण उघडे ठेवण्यात आले होते. परंतु, तिथे कोणतीही सुरक्षात्मक यंत्रणा किंवा रस्ता रोधक (बॅरिकेड्स) लावण्यात आले नव्हते. मुसळधार पावसामुळे अस्लम शेख यांना उघड्या मॅनहोलचा अंदाज आला नाही आणि त्यांचा तोल जाऊन ते २५ फूट खोल मॅ नहोलमध्ये (पान ४ वर)

# उत्तराखंडमध्ये पावसाचा कहर; बद्रीनाथ मार्गावर दरड कोसळली

रुद्रप्रयाग दि.२ (वृत्तसंस्था)- मुसळधार पावसामुळे उत्तराखंडमध्ये कहर केला आहे. राज्यात नद्यांना पूर आला आहे. भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत. बद्रीनाथ महामार्ग अनेक ठिकाणी बंद करण्यात आला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव ऋषिकेशमध्ये रिव्हर राफ्टिंगवरही बंदी घालण्यात आली आहे. बद्रीनाथ मार्गावर दरड कोसळल्याने शेकडोच्या संख्येने भाविक अडकले आहेत. बद्रीनाथकडे जाणाऱ्या मार्गावर दरड कोसळल्याने महाराष्ट्रातल्या भाविकांचा सुद्धा खोळंबा झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक प्रवासी बद्रीनाथमध्ये अडकले आहेत. गेल्या १२ तासांपासून प्रवासी एकाच जागेवर अडकून आहेत. दरम्यान, प्रशासनाकडून दरड बाजूला काढण्याचे काम सुरू आहे.





हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार उत्तराखंडच्या बहुतांश भागात मान्सून आता सक्रिय झाला आहे. पिथोरगड, रुद्रप्रयाग, चमोली, हरिद्वार, उधम सिंग नगर आणि बागेश्वरमध्ये काल रात्रीपासून पाऊस सुरू आहे. हवामान विभागाने (पान ४ वर)

## टीईटी पेपरफुटी प्रकरणात आणखी तिघे जेरबंद; अटक आरोपींची संख्या ७ वर

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात ठाणे पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) उत्तरप्रदेशातून आणखी तीनजणांना अटक केली आहे. यामुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता सातवर पोहोचली असून, फरार मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता आणि त्याच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. या अटकसत्रामुळे पेपरफुटी मागील मोठी साखळी उघड होण्याची चिन्हे आहेत.

सोनू सिंह, मिथुन सिंह आणि कपिल दहिया अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. मुंबई-नाशिक महामार्गालगतच्या भिवंडीतील डोंगराळ भागात कोनगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत टीईटी प्रश्नपत्रिकांच्या प्रती जप्त केल्या होत्या. याप्रकरणात राजीव शाव, आकाश कुमार आणि धीरज सिंग या तिघांना अटक करण्यात आली होती.

या पेपरफुटी प्रकरणाचे पडसाद राज्यभर उमटले. दरम्यान, याप्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारने ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे सह पोलीस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक नेमले असून या (पान ४ वर)

# शेतीकामासाठी गाळ, मुरूमावरील रॉयल्टी रद्द-महसूलमंत्री

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- बळीराजाला आता स्वतःच्या शेती सुधारणेसाठी, विहीर, गोठा किंवा शेतघर बांधण्यासाठी लागणाऱ्या माती आणि मुरूमासारख्या गौण खनिज (स्वामित्व धन) मोफत देण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या मालकीचे ट्रॅक्टर किंवा बैलगाड्या अडवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणाऱ्या पोलीस किंवा महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत निवेदनाद्वारे दिली.

राज्याची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याने ग्रामीण भागाचा विकास जलद गतीने व्हावा, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. जलसंपदा आणि मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील जलकुंभ, गावतळी, शेततळी, पाझर तलाव, गाव नाले, महसुली नाले, बंधारे, मालगुजारी तलाव, लघुसिंचन तलाव किंवा स्वतःच्या शेतातून गाळ, माती व मुरूम काढण्यास आता पूर्ण मुभा असेल. पावसाळ्यात शेतात आणि शेतरस्त्यांवर होणारा चिखल दूर करणे, खड्डे भरणे, विहीर खणणे, जनावरांचा गोठा बांधणे आणि शेतघर दुरुस्तीसाठी या गौण खनिजाचा थेट वापर करता येईल.

शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्याला केवळ स्थानिक महसूल मंडळ अधिकाऱ्याकडे एक साधा अर्ज करावा लागेल. संबंधित मंडळ अधिकाऱ्याने अर्जावर १५ दिवसांच्या आत परवानगी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तलाव किंवा नाले जलसंधारण विभागाचे असतील तर त्या विभागाचे आणि महसुली नाले असल्यास तहसीलदारांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

## मराठीच्या अभिजात दर्जानंतर विकासकामांना गती-मंत्री उदय सामंत

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर उत्कृष्टता अध्ययन केंद्र स्थापनेसाठीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला असून, केंद्राच्या मंजुरीची प्रतीक्षा असली तरी राज्य शासनाने मराठी भाषा संवर्धनासाठी विविध महत्त्वाकांक्षी उपक्रमांची अंमलबजावणी सुरू केली आहे, अशी माहिती उद्योग तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली.

म.वि.प. नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेत सदस्य श्रीमती उमा खापरे, जगन्नाथ अभ्यंकर, अमित गोरखे, मनीषा कायंदे यांनी चर्चेत सहभाग घेतला. त्यावेळी मंत्री सामंत बोलत होते.

मंत्री सामंत म्हणाले की, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानतो. उत्कृष्टता अध्ययन केंद्र स्थापनेची प्रक्रिया ही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) कार्यपद्धतीनुसार होत असून, त्यासाठी आवश्यक प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला आहे.

मराठी (पान ४ वर)

# लोहगड खून प्रकरणात पोलीस आरोपींची लाय डिटेक्टर टेस्ट करणार

पुणे दि.२ (प्रतिनिधी)- पुण्यातील प्रसिद्ध रिअल इस्टेट व्यावसायिक केतन अग्रवाल यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासाला आता मोठी गती आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरी हे दोघेही पोलिसांना तपासात सहकार्य करत नसून ठोस उत्तरं देणं टाळत आहेत. आरोपी सतत माहिती लपवून ठेवत असल्याने, अखेर त्यांच्याकडून खरं वधवून घेण्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस आता लाय डिटेक्टर टेस्ट करण्याची तयारी करत आहेत.

गुन्हे अन्वेषण क्षेत्रात लाय डिटेक्टर टेस्टला तांत्रिक भाषेत पॉलिग्राफ टेस्ट असे म्हटले जाते. या चाचणीदरम्यान संबंधित मशीन आरोपीच्या शरीरातील जैविक आणि शारीरिक प्रतिक्रियांमधील (उदा. रक्तदाब, नाडीचे ठोके, श्वासोच्छवास) बदलांची अचूक नोंद करते. या नोंदींवरून ती व्यक्ती विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं खरी देत आहे की खोटे बोलून पोलिसांची दिशाभूल करत आहे, हे स्पष्ट होते. भारतात पॉलिग्राफ टेस्टचे निष्कर्ष थेट पुरावा म्हणून न्यायालयात ग्राह्य धरले जात नसले, तरी पोलिसांना तपासाची योग्य दिशा मिळवण्यासाठी हे एक अत्यंत प्रभावी माध्यम मानले जाते. केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरी यांची पोलीस कोठडी उद्या, ३ जुलै रोजी संपत आहे. त्यामुळे शुक्रवारी सकाळी ११ वाजता या दोन्ही आरोपींना वडगाव न्यायालयात हजर केले जाईल.

## मराठी बालभारतीच्या ६ वीतील लोकनृत्य धड्यावरुन वाद; गुजरातसह इतर ४ राज्यातील लोकनृत्यांचा समावेश

नागपूर दि.२ (प्रतिनिधी)- राज्यात यंदाच्या वर्षापासून एकीकडे सीबीएससी पॅटर्ननुसार शालेय शिक्षणपद्धती अवलंबली जात असून मराठी हा विषय सक्तीचा आहे. मात्र, दुसरीकडे मराठी आणि महाराष्ट्र विषयावरुन नेहमीच शिक्षण विभागातील काही ना काही त्रुटी समोर येतात. आता, बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील लोकनृत्य धड्यावरून नव्या वादाला सुरुवात झाली आहे. कारण, या धड्यात एकूण पाच लोकनृत्यांचा समावेश आहे. त्यापैकी, केवळ एक लोकनृत्य महाराष्ट्रातील असून इतर चार परराज्यांतील आहेत. त्यामुळे, आता या धड्याला विरोध होत असून शासन दखल घेणार का, हे पाहावे लागेल.

महाराष्ट्रातील लावणी, लेझीम, धनगरी गजा, गोंधळ, कोळी नृत्य, पोवाडा यांसारख्या समृद्ध लोकपरंपरेला पुरेसे स्थान न दिल्याने जेष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशींसह शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक आणि सांस्कृतिक जाणकारांनी यावरुन नाराजी व्यक्त केली आहे. विद्यार्थी सहाव्या इयत्तेत शिकत असता राज्यातील विद्यार्थ्यांना (पान ४ वर)

# विद्यार्थ्यांना शाळेतूनच पुस्तकांची सक्ती केली, सीबीएसई शाळांवर कारवाई होणार; समिती नेमणार, मंत्र्यांची विधानसभेत घोषणा

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- राज्यात १५ जूनपासूनच शाळांना सुरुवात झाली असून आता नियमित शाळा सुरू झाल्याने पालक आणि विद्यार्थी देखील शालेय जीवनात मग्न झाले आहेत. शाळेच्या पहिल्याच आठवड्यात विद्यार्थ्यांन शालेय पाठ्यपुस्तके आणि इतर साहित्य खरेदीसाठ पालकांची लगबग दिसून आली. मात्र, बहुतांशी खासगी आणि स्वयंअर्थसहाय्य शाळांनी विद्यार्थ्यांना आपल्याच शाळेतून पुस्तके खरेदी करण्याची सक्ती केल्याचं पाहायला मिळालं. आता, विधिमंडळ सभागृहात शाळेतील विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला असून शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी उत्तर दिले. तर, अशा शाळांवर लक्ष ठेवण्यासाठी समिती नेमली जाईल, असे मंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.

राज्यातील अनेक खासगी तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संलग्न शाळाकडून विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदी करण्याची सक्ती करत पालकांची लूट केली जात आहे. विद्यार्थ्यांसाठी खासगी शाळांमधून मोठ्या प्रमाणात वाढीव दराने वह्या पुस्तकांची विक्री करण्यात येत असून खासगी दुकानातून वह्या पुस्तकांच्या विक्रींच्या किंमतीत मोठी तफावत आहे. याबाबत शासनाकडून कोणत्याही शाळांनी विशिष्ट दुकानातून पुस्तक घेण्याबाबतची सक्ती करू नये, असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत बोलताना म्हटले. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास शालेय शिक्षण विभागाकडून कारवाई करण्यात येणार असून काही शाळांना नोटिसा दिल्या असल्याची माहिती देखील शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरातून दिली.

शालेय शिक्षण विभागातील शाळांमधून होणाऱ्या ह्या लुटालुटीबाबत सभागृहात चर्चा झाली, गोंधळ देखील झाला. तसेच, अशा शाळांवर लक्ष ठेवण्यासाठी समितीची घोषणा शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली. त्यामुळे, आता ही समिती नेमकं कधी स्थापन होणार आणि समितीकडून खरंच अशा शाळांवर कारवाई होणार का? हे पुढील काळातच पाहायला मिळेल.

राज्यात (पान ४ वर)

## कोठडीतील मृत्यू प्रकरणी ९ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा; १५ वर्षांनंतर पारधी कुटुंबाला न्याय

वाशिम दि.२ (प्रतिनिधी)- वाशिम जिल्हा सत्र न्यायालयाने एका अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रकरणात ऐतिहासिक निकाल दिला आहे. सन २०११ मध्ये पोलिस कोठडीत असताना झालेल्या अमानुष मारहाणीत एका संशयित तरुणाचा मृत्यू झाला होता. या कस्टोडियल डेथ प्रकरणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने तत्कालीन ठाणेदारासह तब्बल नऊ पोलिस कर्मचाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा सत्र न्यायाधीश जयसिंग झपाटे यांनी हा निकाल दिला असून, या निर्णयामुळे महाराष्ट्र पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, हे प्रकरण ९ मे २०११ रोजी घडले होते. रिसोड पोलिस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी (ठाणेदार) महादेव माणिक धांडे आणि त्यांच्या इतर ८ कर्मचाऱ्यांनी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात असलेल्या वाढोणा येथील पारधी वस्तीवर छापा टाकला होता. एका चोरीच्या गुन्ह्यात संशयित म्हणून पोलिसांनी बेग्या पवार या तरुणाला ताब्यात घेतले होते. चोरीचा गुन्हा कबूल करण्यासाठी (पान ४ वर)

# वारकऱ्यांची ‘चरण सेवा’

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे ‘चरण सेवा’ उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरण सेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या ‘चरण सेवा’ उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील. आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तत्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षी राबविण्यात आलेल्या ‘चरण सेवा’ उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

‘भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची’ या संकल्पनेवर आधारित ‘चरण सेवा’ हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय म दत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे. संत तुकाराम महाराजांनी ‘तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा’, या अभंगातून चरण सेवेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ’चरण सेवा’ उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्षे आहे. आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर म ोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच ’चरण सेवा’ होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून ‘चरण सेवा’ उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या म ाध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज झाली आहे.

## कैद्यांच्या स्वतःच्या पैशातून मुलांना खाऊ देण्याची सुविधा; पुनर्वसनाच्या दिशेने कारागृह प्रशासनाचे कौतुकास्पद पाऊल

कारागृह प्रशासनाने बाप लेकराचे प्रेम, हर्सूल कारागृहात भावस्पर्शी सोहळा आयोजित केला होता. या मध्ये कैद्याच्या पैशातून त्यांना मुलांना खाऊ देण्याची सुविधा केली होती. या कार्यक्रमात सहभागी ६० कैद्यांना आनंदआश्रु व तितकेच आपण केलेल्या कृत्या विषयी पस्तावा होत असेल पण आता शिक्षा भोगण्याशिवाय त्यांच्या कडे पर्याय नाही. पण प्रशासनाने घेतलेला निर्णय खूपच छान होता यामुळे कैद्यांना कुटुंबातील सदस्य भेटल्या मुळे त्यांच्या आचरणात जास्तीत जास्त चांगला बदल होईल त्यांची चांगली वागणूक बघून त्यांना खुले कारागृह मिळू शकते किंवा त्यांची शिक्षा पण कमी होऊ शकते कायद्यात तशी तरतूद असेल तर, नक्कीच कैद्यांसाठी हे प्रशासनाने उचललेले आत्मविश्वासू पाऊल आहे.

**– सुदाम भाऊसाहेब शिंदे**
मु.पो.ता.विनायक कॉलनी वैजापूर

# श्रद्धा, सत्ता आणि मौन




**देशाच्या** राजकारणात काही विषय असे असतात की, त्यांच्यावर सरकारची भूमिका जितकी महत्त्वाची असते, तितकेच महत्त्व त्या विषयावरचे सरकारचे मौनही असते. कारण लोकशाहीत शांतता म्हणजे नेहमीच समाधान नसते तर अनेकदा ती उत्तरदायित्वापासून दूर राहण्याची भूमिका असते. आज देशासमोर असेच दोन गंभीर प्रश्न उभे आहेत. एक अयोध्येतील राम मंदिराशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप आणि दुसरे सातत्याने घडणाऱ्या विविध भरती व स्पर्धा परीक्षांतील पेपरफुटीच्या घटना. या दोन्ही विषयांनी देशभरात चर्चा निर्माण केली आहे. मात्र या प्रश्नांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मौन अधिकच चर्चेचा विषय ठरत आहे. राम मंदिर हा केवळ दगड-विटांचा प्रकल्प नाही, तो कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा विषय आहे. अनेक दशकांच्या संघर्षानंतर उभे राहिलेले हे मंदिर राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक म्हणून मांडले गेले. त्यामुळे त्याच्याशी संबंधित कोणत्याही आर्थिक व्यवहारात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि शंका दूर करणारी स्पष्ट भूमिका अपेक्षित असणे स्वाभाविक आहे. विविध माध्यमांमध्ये मंदिर परिसरातील कामे, जमीन व्यवहार किंवा निधीच्या वापराबाबत वेळोवेळी आरोप समोर आले. हे आरोप सिद्ध झाले आहेत, असे म्हणणे योग्य ठरणार नाही, परंतु आरोप झाले असतील तर त्यांची निष्पक्ष चौकशी व्हावी, ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा आहे.

श्रद्धेच्या नावाने जनतेकडून विश्वास मागायचा आणि त्याच श्रद्धेशी संबंधित प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक किंवा धर्मविरोधी ठरवायचे, ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोकादायक आहे. कारण श्रद्धेला प्रश्न विचारले जात नाहीत, पण सार्वजनिक निधी, संस्थात्मक निर्णय आणि प्रशासनाला नक्कीच विचारले जाऊ शकते. राम मंदिर हे कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नसून देशाच्या भावविश्वाचा भाग आहे. त्यामुळे त्याच्या व्यवस्थापनातील पारदर्शकता ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. दुसरीकडे, पेपरफुटीच्या घटनांनी तर देशातील लाखो तरुणांचे भविष्य अक्षरशः वेठीस धरले आहे. मागील काही वर्षांत विविध राज्यांतील तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक भरती परीक्षा आणि प्रवेश परीक्षा पेपरफुटीच्या आरोपांनी गाजल्या. विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात, आर्थिक अडचणींवर मात करतात, कुटुंबाच्या अपेक्षा सांभाळतात पण परीक्षेच्या आदल्या दिवशी किंवा परीक्षेनंतर पेपरफुटी झाल्याचे समोर येते आणि त्यांच्या परिश्रमांवर एका क्षणात पाणी फिरते. पेपरफुटी ही केवळ परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी नाही तर ती देशाच्या गुणवत्ताधारित व्यवस्थेवरचा हल्ला आहे. मेहनती विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खचवणारी आणि भ्रष्ट मार्ग स्वीकारणाऱ्यांना प्रोत्साहन देणारी ही प्रवृत्ती आहे. जेव्हा वारंवार अशा घटना घडतात, तेव्हा प्रश्न फक्त गुन्हेगारांचा राहत नाही तर प्रश्न व्यवस्थेच्या अपयशाचा बनतो.

केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा कायदा लागू केला, कठोर शिक्षेच्या तरतुदी केल्या. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी कायदे पुरेसे नसतात, त्यांची प्रभावी अंमलबजावणी अधिक महत्त्वाची असते. जर पेपरफुटीची मालिका सुरूच राहिली, तर कायद्याची भीती कुठे आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. या दोन्ही विषयांना जोडणारा समान धागा म्हणजे ‘विश्वास’. राम मंदिरावरील विश्वास आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास. समाजाचा विश्वास तुटू लागला, तर कोणतीही व्यवस्था मजबूत राहू शकत नाही. म्हणूनच या प्रश्नांवर सरकारने केवळ प्रशासकीय नव्हे, तर नैतिक नेतृत्वही दाखवणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील सर्वाधिक प्रभावशाली राजकीय नेतृत्व मानले जातात. एखाद्या यशस्वी मोहिमेचे श्रेय स्वीकारताना त्यांचे नेतृत्व पुढे येते. मग गंभीर आरोप, व्यवस्थेतील त्रुटी किंवा जनतेच्या अस्वस्थतेच्या प्रश्नांवरही त्याच नेतृत्वाने स्पष्ट भूमिका मांडणे अपेक्षित नाही का? लोकशाहीत नेतृत्वाची खरी कसोटी संकटाच्या वेळी होते, यशाच्या वेळी नव्हे. हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रश्न विचारणे म्हणजे सरकारविरोधी भूमिका नव्हे. उलट, सत्तेला प्रश्न विचारणे ही लोकशाहीची ताकद आहे.

कोणत्याही सरकारला जनतेने अमर्याद अधिकार दिलेले नसतात तर जनतेने त्यांना उत्तरदायित्वाची जबाबदारी दिलेली असते. त्यामुळे ‘पंतप्रधान गप्प का?’ हा प्रश्न व्यक्तीविरोधी नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा प्रश्न आहे. आज देशातील तरुण रोजगार, परीक्षा आणि संधी याबाबत अस्वस्थ आहेत. दुसरीकडे धार्मिक श्रद्धेशी संबंधित संस्थांमध्ये पारदर्शकतेची अपेक्षा वाढत आहे. या दोन्ही भावना दुर्लक्षित करणे योग्य ठरणार नाही. सरकारने सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि पारदर्शक माहिती जनतेसमोर ठेवण्याची तयारी दाखवली पाहिजे. त्यामुळे अफवा थांबतील आणि विश्वास अधिक दृढ होईल. लोकशाहीत मौन हे अनेकदा राजकीय धोरण असू शकते, परंतु दीर्घकाळ टिकणारे मौन लोकांच्या मनात संशय निर्माण करते. संशयाला उत्तर देण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पारदर्शकता. श्रद्धेचे राजकारण करता येते पण श्रद्धेचा विश्वास टिकवण्यासाठी प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्याचप्रमाणे युवकांच्या भविष्याची भाषा भाषणांतून करता येते, पण त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी निष्पक्ष आणि भ्रष्टाचारमुक्त परीक्षा व्यवस्था उभारावी लागते. देशाला आज घोषणांपेक्षा उत्तरांची गरज आहे. प्रश्नांना विरोधकांचा अजेंडा म्हणून नाकारण्यापेक्षा त्यांना लोकशाहीच्या आरशात पाहणे अधिक आवश्यक आहे. कारण राम मंदिराची प्रतिष्ठा असो किंवा विद्यार्थ्यांचे भविष्य दोन्हीही पक्षीय राजकारणापलीकडचे विषय आहेत. देशाला आज घोषणांपेक्षा उत्तरांची गरज आहे. कोणत्याही आरोपांचे सत्य न्याय्य, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशीतूनच समोर यायला हवे. प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक म्हणून नाकारण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांकडे लोकशाहीच्या आरशातून पाहणे अधिक आवश्यक आहे. कारण राम मंदिराची प्रतिष्ठा असो वा देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य, हे दोन्ही विषय पक्षीय राजकारणाच्या पलीकडचे आहेत. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने या मुद्द्यांवर स्पष्ट, ठाम आणि पारदर्शक भूमिका मांडली, तर लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ होईल. अन्यथा मौनाचे अर्थ जनता स्वतः लावू लागते. लोकशाहीत सत्तेपेक्षा उत्तरदायित्व मोठे असते आणि जेव्हा उत्तरांपेक्षा मौन अधिक बोलके ठरते, तेव्हा लोकशाहीतील प्रश्न अधिक गंभीर बनतात.

# विजया मेहता : मराठी रंगभूमीला नवी दिशा देणाऱ्या दिग्दर्शिकेचा अखेरचा पडदा

## विजया मेहता यांच्यावर राज ठाकरे यांनी लिहिलेला लेख

**ज्येष्ठ** रंगकर्मी विजया मेहता यांचं निधन झालं. विजयाबाई जवळपास ७० वर्ष तर नक्कीच रंगभूमीवर कार्यरत होत्या. कदाचित गेली काही वर्ष किंवा एखादं दशक असं असेल की त्या कदाचित फारशा सक्रीय नसतील, पण विजयाबाईसारख्या व्यक्तीच्या असण्याने सुद्धा अनेक माणसं प्रेरणा घेऊन, प्रयोग करत राहतात, त्यामुळे त्यांच्यासारख्यांचं असणं म हत्वाचं. जेंव्हा आसपास खुज्यांची खोगीरभरती सुरु आहे असं वाटत असतं तेंव्हा विजयाबाईसारखी माणसंसुद्धा आहेत हे देखील त्या क्षेत्रातील माणसाला दिलासादायक असतं.



माझी विजयाबाईच्या बाबतीतील पहिली आठवण १९८८ च्या आसपासची. माझ्या आणि शर्मिलाच्या साखरपुड्यात अर्थात माझ्या सासऱ्यांमुळे म्हणजे मोहन वाघांमुळे पहिल्यांदाच विजयाबईना भेटण्याचा योग आला . त्यानंर अनेकदा गाठीभेटी झाल्या. मला त्यावेळेस पहिल्यांदा प्रश्न पडला की या मेहता इतक्या सुंदर मराठी कसं काय बोलतात आणि त्यात मराठी रंगभूमीसाठी एवढं काम का करतात ? मग समजलं की मूळच्या विजया जयवंत ! मराठी कुटुंबात जन्मलेल्या ! अर्थात रंगभूमीच्या बाहेरच्या लोकांना अजूनही बऱ्याचदा हा प्रश्न पडतो ! असो . .

माझे मराठी रंगभूमीवर काम करणारे अनेक कलाकार हे परिचयाचे आहेत , अनेक कलाकार, दिग्दर्शक यांच्याबद्दल चर्चा होत असते परंतु जेव्हा कधी विजयाबाईचं नाव येतं तेव्हा ते सर्व आपापले कान पकडतात ! मी नेहमी सांगत असतो की मला नाटक हा कलाविष्कार कधी समजलाच नाही, म्हणजे त्याची मांडणी ! माझ्या मते नाटक हा विषय चित्रपट, वेब सिरीज, सिरियल किंवा अजून काही असेल यापेक्षा प्रचंड कठीण आहे ! आणि त्यात विजयाबाईबद्दल ही सर्व मंडळी जेव्हा भरभरून बोलतात तेव्हा समजतं की या बाई देखील त्याहून सम जण्या पलीकडे आहेत !

एखादा माणूस काळाला आकार देतो, का काळ त्या माणसाला घडवतं? याचं उत्तर या दोहोंचा संगम जिथे घडतो तिथे काहीतरी सज्जड घडतं.

मराठी रंगभूमीच्या बाबतीत घडलं ते विजयाबाई, विजय तेंडुलकर असतील, डॉ. श्रीराम लागू असतील किंवा त्यांच्यासारख्या इतरांच्या रूपाने. या सगळ्यांना आसपासचा काळ कसा बदलतोय, जग कसं बदलतंय याचं अचूक भान होतं. त्या जगाकडे बघण्याची हिंमत होती. इथे हिंमत होती अशा अर्थाने म्हणतोय की आपल्या जगापेक्षा खरंच काहीतरी वेगळं, मोठं बाहेर सुरु आहे हे बघणं, ते मान्य करणं. आणि आपल्या जगात असलं काही नाही हे मान्य करणं आणि त्यातून काहीतरी आपल्या अस्सल भारतीय, मराठी जाणिवांना साजेसं निर्माण करणं, याला एक वेगळी शक्ती लागते. ती शक्ती त्या काळात अनेकांच्यात होती. ती विजयाबाईच्यात पण होती.

‘रंगायन’ नाट्य संस्थेच्या त्या प्रमुख संस्थापक. ‘रंगायन’ने प्रायोगिक रंगभूमीला आकार दिला. १९६० च्या दशकांत जेंव्हा रंगायनची स्थापना झाली, तेंव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. तेंव्हा प्रबोधन आणि सामाजिक सुधारणा याच्यात अग्रेसर असलेल्या म हाराष्ट्रात, औद्योगिक पाया रचला जात होता. यंत्रयुगाशी आणि त्या यंत्रयुगाचा उगम ज्या जगात झाला त्या जगाशी मराठी माणसाची तोंडओळख व्हायला लागली होती. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाला सुरुवात झाली होती.

साहित्यात प्रयोग होत होते. नेमाडेंचं कोसला ज्याने मराठी साहित्यात खळबळ उडवली ते त्याच काळातलं. त्यामुळे मराठी रंगभूमी म्हणजे भव्य सेट्स, मेलोड्रामा याच्या पलीकडे जाऊन काहीतरी वेगळं नाटक असावं, त्याने किती तिकिटं विकली गेली याची चिंता करू नये, त्याने खऱ्या अर्थाने प्रायोगिक व्हावं याची गरज निर्माण झाली. आणि ती पोकळी विजयाबाईनी भरून काढली. मराठी सिनेमा बदलायला तयार नसल्यामुळे मोठ्या अपेक्षेने तेंव्हाचा तरुण रंगभूमीकडे अपेक्षेने बघत होता आणि ती अपेक्षा विजयाबाईनी पूर्ण केली.

विजयाबाईना कुठेतरी, अस्तंगतला काय चाललं आहे, किंवा गेल्यात जमा आहे याचं एक सुप्त आकर्षण पण होतं आणि भान पण असावं. विजयाबाईनी दिग्दर्शित केलेल्या नाटकांची संख्या मोठी, त्यांनी अभिनय केलेली नाटकं पण अनेक. पण त्यांनी दिग्दर्शित केलेली आणि रंगभूमीवर मैलाचा दगड ठरलेली नाटकं म्हणजे हमीदाबाईची कोठी, बॅरिस्टर, पुरुष, संध्याछाया, वाडा चिरेबंदी.

बॅरिस्टरमधल्या परदेशात शिकून आलेल्या, नव्या विचारांची झुळूक अनुभवलेल्या नायकाला खटकणाऱ्या रूढी परंपराशी सुरु असलेला त्याचा वाद. ‘पुरुष’ मध्ये पितृसत्ताक व्यवस्थेने जन्माला घातलेल्या सत्ता, हुकूमत या कल्पनांना दिलेलं आव्हान. किंवा वाडा चिरेबंदी मधील जुनी शब्दशः ओसाड गावची सत्ता राहिलेली जमीनदारी नष्ट होण्याच्या काळात, कालबाह्य झालेल्या रूढी परंपरा टाकून, नव्याने स्वतःला सिद्ध करणं यात दोन पिढ्यांच्यातील सुरु असलेला संघर्ष असो. हा संघर्ष विजयाबाईनी अचूक उभा केला. हे करताना विजयाबाईनी कोणाला नायक ठरवलं नाही की कोणाला खलनायक. जो तो आपल्या जागी योग्य. मी वर म्हटलं तसं काळ कुठे बदलतोय याचं अचूक भान आणि त्यावरच नाटकातून प्रकटीकरण ही फक्त मराठीच नाही तर भारतीय रंगभूमीला विजयाबाईनी दिलेली देणगी.

विजयाबाईनी पुढे जाऊन सिनेमा केला. जागतिक रंगभूमीवर काय सुरु आहे हे बघून त्यांनी त्याला मराठी साजात सादर केला, पण या सगळ्यातून त्यांनी मराठी थिएटरमध्ये एक शिस्त आणली.

तालमी कशा कराव्यात, नटाने कशी तयारी करावी, पाठांतर कसं करावं, आपल्या भूमिकेचं मानसशास्त्र कसं समजून घ्यावं हे इथे किमान २ पिढ्यात रुजवलं. त्यामुळे मराठी नट हे हिंदीत किंवा इतर भाषांत गेल्यावर सहज काम करतात असा अभिप्राय आपण ऐकतो त्याचं मोठं श्रेय विजयाबाईना जातं. बरेचसे लोक आपण कोण आहोत हे दाखवायला येतात पण काही जणं हे त्या समाजाला शिकवायला येतात. त्यापैकी विजयाबाई ह्या होत्या. काल विजयाबाई गेल्या. अशी पिढीच्या पिढी घडवणारी व्यक्ती परत कुठून मिळणार हा प्रश्न आहे. अर्थात जर काळाची गरज असेल तर ती निर्माण होते अन्यथा नाही. पण तोपर्यंत विजयाबाईसारखी व्यक्ती होती, आणि मापदंड काय असतो हे किमान महाराष्ट्राला, इथल्या कलाकारांना विजयाबाईच्या रूपाने कळेल.

## आनंदलहरी भाग-१५६

**पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ।।**

ईश्वर केवळ मूर्तीमध्ये नसून तो सर्व जीवमात्रात आहे, असा संत संदेश असतांनाही, अनेक ईश्वर भक्तांना तो केवळ मंदिर, मूर्तीमध्येच दिसतो. द्वैतभावाची ही भक्तांची वृत्ती त्यांना खऱ्या ईश्वरापासून दूर ठेवते. पण संतवचनावर ज्यांचा विश्वास आहे, अशी भक्तमंडळी ईश्वराला स्वत:च्या अंतरंगात व सर्व प्राणीमात्रात पाहतात. चालत्या बोलत्या जीवरुपी ईश्वराला ओळखता आले पाहिजे. सर्व जीवमात्रात भगवंताला पाहून झाल्यानंतर उरल्या-सुरल्या दगडा-धोंडयातही संतांनी भगवंताला पाहिले आहे. संसारात अडकलेल्या जीवाचे मात्र असे नाही. तो प्रथम दगडा-धोंड्यात भगवंताला पाहतो आणि संतकृपा झालीच तर मग तो प्राणीमात्रात ईश्वराला पाहण्याचा प्रयन्त करतो. ईश्वर आणि प्राणीमात्र यांच्यात भेद करणाऱ्याला स्वत:चे वेगळे असे अस्तित्व जाणवत असते. हा वेगळेपणा त्याला मी, माया, मोह, अहंकार, द्वेष, मत्सर अशा शत्रुंच्या सहवासात ठेवतो. हे शत्रू त्याला समता, बंधुता, जिव्हाळा अशा मित्रांपासून दूर ठेवण्याचे काम करतात. या सर्व बाबींची जाणीव संतांना वेळीच होत गेली. म्हणून त्यांनी मूळात स्वत:तच भगवंताला पाहिले. विठ्ठल रुखमाई हे केवळ पंढरपूरच्या मंदिरात नसून ते पाहिल तिकडे दिसणाऱ्या सर्व जिवमात्रात, चराचरात असल्याची अनुभूती तुकाराम महाराजांनी तुम्हा-आम्हाला सांगितली. आपले अनुभवी बोल स्पष्ट करतांना ते म्हणतात, ‘पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई।। वा पट्टण एक भाव । अवघा ठाव सरता झाला । आठव नाहीं सुख दु:खा । नाचे तुका कौतुकें ।’



सर्व देही विठ्ठल रखुमाईच आपणाला दिसतात. चालता-बोलत्या जीवाबरोबर मुक्या प्राण्यातही माता-पिता असणारे विठ्ठल-रखुमाई तर दिसतातच, पण गांव, शहर, जंगल, वन अशा सर्व ठिकाणी आमचा भाव सारखाच आहे. स्थळ, काळ, वेळ याचा कसलाही विपरीत परिणाम आपल्या भावावर होत नाही. सर्व ठिकाणी समभावच असल्याचेही तुकोबा माऊली म्हणतात. महाराजांच्या या बोलाला प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची अत्यंत गरज आहे. संसारात अडकलेला जीव माया, मोह, अहंकाराने त्रस्त होत चालला आहे. त्याच्या डोक्यावर स्वार्थाची पट्टी आवळली जाऊन त्याचे विश्व त्याच्यापुरते मर्यादित होत चालले आहे. सर्व जीवमात्राच्या किंवा चराचराच्या ठिकाणी भगवंताला पाहण्याचे तर सोडाच जन्म देणाऱ्या आई-वडीलांच्या ठिकाणीही या जिवाला भगवंत दिसेनासा झाला आहे. त्यामुळेच अनेक वृध्द आई-वडीलांना वृध्दाश्रमाची वाट धरण्याची वेळ येत आहे. भावा-भावातील, पती-पत्नीतील वाद वाढत आहेत. माणूस माणसापासून व खऱ्या अर्थाने स्वत:पासून दूर चालला आहे. मानवाला माणूस म्हणून जगण्यासाठी व आपल्याबरोबर इतरांना सुख-समाधान मि ळण्यासाठी ज्ञानोबा-तुकारामांच्या वचनांचा स्विकार करण्याची गरज आहे. माणसाने जीवमात्रात भगवंताला पाहण्याची सुरुवात आपल्या कुटूंबातील सदस्यांपासून केली पाहिजे. आपली ही सुरुवात आपणाला अभेद्य दृष्टीच्या पूर्णत्वाला नेऊन पोहचविणारी व आपणाला सुख-दु:खाची आठवण न होता महाराजांप्रमाणे निर्भेळ आनंदात रमविणारी ठरो, अशी तुकोबांचरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी। ज्ञानदास

**– डॉ. विजयकुमार फड**

# प्रसिद्ध 'यल्ला यल्ला' आणि 'आईच्या गावात' रेस्टॉरंटवर एफडीएचा छापा

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – शहरातील प्रसिद्ध 'यल्ला यल्ला' आणि 'आईच्या गावात' या दोन रेस्टॉरंटवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या तपासणीत किचनमधील गंभीर अनियमितता उघडकीस आल्याने दोन्ही हॉटेल्सचे परवाने पुढील आदेशापर्यंत तातडीने निलंबित करण्यात आले आहेत.

विद्यानगर येथील 'यल्ला यल्ला' रेस्टॉरंटमध्ये बटर चिकन, कबाब आणि चिकन लॉलीपॉपच्या ग्रेव्हीत मोठ्या प्रमाणावर सिंथेटिक फूड कलर वापरला जात असल्याचे आढळले. एफडीएच्या पथकाने २० ते २५ रासायनिक रंगांचे डबे जप्त करून नष्ट केले.

तर ईतखेडा–कांचनवाडी येथील 'आईच्या गावात' रेस्टॉरंटमध्ये मेन्यूकार्डवर बटर नान नमूद करून प्रत्यक्षात स्वस्त दर्जाचे वेजिटेबल फॅट स्प्रेड वापरून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचे उघड झाले. याशिवाय रसासाठी बुरशी लागलेले आंबे आणि सडलेल्या पालेभाज्या साठवून ठेवल्याचेही तपासणीत आढळले.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियमाचे उल्लंघन झाल्याने एफडीएचे अधिकारी व. ता. रोडे, कि. ल. झाडे आणि सहाय्यक आयुक्त द. वि. पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली असून, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात अशा कारवाया अधिक तीव्र केल्या जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# मुख्य अभियंता मृद व जलसंधारण यांचे कार्यालय कार्यान्वित



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील मुख्य अभियंता मृद व जलसंधारण हे कार्यालय आजपासून कार्यान्वित झाले. मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांनी कार्यालयाच्या कामकाजास सुरुवात केली. मृद व जलसंधारण आयुक्त प्रतिभा इंगळे, 'वाल्मी'चे महासंचालक सुनिल कुशिरे, जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज, वाल्मी सहसंचालक सुभाष कापगाते, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, जलसंधारण महामंडळाचे मुख्य लेखा परीक्षक गणेश पाटील, उपअभियंता किरण चाबुस्कवार, धोडाराम कासले, गणेश मुळे, महेश निनाळे, पवन ठरले, सह प्रादेशिक दक्षता गुण नियंत्रक कार्यलय, वाल्मी व आयुक्त कार्यालयामधील अधिकारी व कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

मृद व जलसंधारण विभागाच्या दि.२७ मे च्या शासन निर्णयानुसार मुख्य अभियंता मृद व जलसंधारण छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील ८ तसेच नाशिक प्रादेशिक विभागातील ५ असे एकूण १३ जिल्ह्यांचे असणार आहे.

या कार्यालयाचे पहिले मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांची करण्यात आली आहे.आयुक्त मृद व जलसंधारण यांनी त्यांचेकडे हा पदभार देण्यात आला आहे. वाल्मी परिसर, कांचन वाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे हे कार्यालय कार्यान्वित झाले आहे.

# कर्जमुक्तीकडून आत्मनिर्भर तिकडे... बळीराजासाठी नवी आशा

**'जय जवान,** जय किसान' या विचाराचा खरा अर्थ साकार करणारा अन्नदाता शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. स्वतःच्या कष्टाने तो संपूर्ण समाजाचे अन्नसुरक्षेचे दायित्व सांभाळतो. मात्र, निसर्गाची अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ–उतार आणि आर्थिक संकटांमुळे अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले जातात. अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०२६' ही लाखो शेतकरी कुटुंबांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

यंदा १ जुलै कृषी दिन, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ही योजना प्रत्यक्षात राबविण्यास सुरुवात होत आहे. कृषी विकासासाठी त्यांनी दिलेल्या दूरदृष्टीपूर्ण योगदानाला ही योजना एक प्रकारे अभिवादन करणारी ठरेल. या योजनेअंतर्गत जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास प्रारंभ होणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, नव्या उत्साहाने शेती करण्याचा आत्मविश्वास निर्माण होईल. योजनेनुसार पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची कर्जमुक्ती देण्यात येणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना राबविण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाकडून प्रोत्साहन मिळणार आहे.


योजनेची संपूर्ण प्रक्रिया आधार क्रमांकावर आधारित आणि ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महाआयटीच्या माध्यमातून लाभार्थ्यांची संगणकीय पडताळणी करण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, संबंधित बँका, आपले सरकार सेवा केंद्र तसेच गाव चावडीवर प्रसिद्ध केल्या जातील. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची व्यवस्था करण्यात आल्याने पारदर्शकता आणि सुलभता अधिक वाढणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी वेळेत आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. ओटीएस योजनेतील लाभार्थ्यांनी शासनाचा लाभ मिळण्यापूर्वी स्वतःचा हिस्सा जमा करणे बंधनकारक राहील. तसेच अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नाही. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा बँकांकडून पीककर्ज घेऊ शकतो, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करू शकतो, सिंचन व यांत्रिकीकरणासाठी गुंतवणूक करू शकतो. त्यामुळे कृषी उत्पादन वाढण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही नवसंजीवनी मिळणार आहे. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर शेती सक्षम होईल आणि शेती सक्षम झाली तर राज्य व देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. त्यामुळे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०२६' ही केवळ कर्जमुक्तीची योजना नसून, बळीराजाला आत्मनिर्भरतेकडे नेणारे आणि ग्रामीण विकासाला नवी दिशा देणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

**संकलन : विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# सुपरस्टार महेश बाबूंनी 'राव बहादूर'चा गूढ ट्रेलर केला प्रदर्शित; सस्पेन्स आणि सायकोलॉजिकल थ्रिलचा अनोखा अनुभव!

सुपरस्टार महेश बाबू आणि नम्रता शिरोडकर यांच्या GMB एंटरटेनमेंटतर्फे यंदाच्या वर्षातील सर्वाधिक प्रतीक्षित सायकोलॉजिकल थ्रिलर 'राव बहादूर' सादर करण्यात येत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन ख्यातनाम दिग्दर्शक वेंकटेश महा यांनी केले असून, बहुआयामी अभिनेता सत्यदेव मुख्य भूमिकेत झळकणार आहे. अ+ड चौंळशी आणि श्रीचक्रास एंटरटेनमेंट्स यांच्या संयुक्त निर्मितीतील हा चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.




सुपरस्टार महेश बाबू प्रस्तुत 'राव बहादूर' हा यंदाच्या वर्षातील सर्वाधिक प्रतीक्षित तेलुगू चित्रपटांपैकी एक आहे. बहुआयामी अभिनेता सत्यदेव मुख्य भूमिकेत असलेल्या या सायकोलॉजिकल थ्रिलरने आपल्या टीझरमधून गूढ विश्वाची झलक दाखवताच प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली होती. आता ही उत्सुकता आणखी वाढवत महेश बाबूंनी चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर प्रदर्शित केला आहे.

ट्रेलरची सुरुवात महेश बाबू यांच्या प्रभावी निवेदनाने होते, जे एका वेगळ्याच कथानकाचा सूर निश्चित करते. ते म्हणतात की, नाटक हे तर्काला मानत नाही असे मानले जाते; मात्र जेव्हा नाटकाची सांगड जादूसोबत घातली जाते, तेव्हा तर्काचे अर्थच बदलून जातात. ही रंजक प्रस्तावना प्रेक्षकांना यापूर्वी कधीही न पाहिलेला सिनेमॅटिक अनुभव मिळणार असल्याचे संकेत देते.

ट्रेलर पुढे सरकत असताना, एका छोट्याशा संशयामुळे आयुष्य कसे पूर्णपणे बदलू शकते, हे दाखवले जाते आणि प्रेक्षकांना सस्पेन्स व सायकोलॉजिकल थ्रिलने भरलेल्या एका खिळवून ठेवणाऱ्या विश्वात नेले जाते.

महेश बाबूंनी 'राव बहादूर' हा तेलुगू चित्रपटसृष्टीत यापूर्वी कधीही न पाहिलेला अनुभव देणारा चित्रपट असल्याचेही सांगितले आहे.

सत्यदेवच्या दमदार आणि तीव्र भूमिकेसह हा ट्रेलर सस्पेन्स, नेत्रदीपक दृश्ये आणि शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या कथानकाची झलक देतो.

'राव बहादूर' हा चित्रपट सायकोलॉजिकल ड्रामासोबतच ढासळत चाललेल्या राजेशाही इतिहासाच्या सावल्यांना एकत्र गुंफणारे कथानक सादर करतो. या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन आणि संकलन वेंकटेश महा यांनी केले असून, स्थानिक संस्कृतीशी घट्ट जोडलेली आणि त्याचवेळी सर्वांना भावेल अशी भावनिक ताकद असलेली कथा त्यांनी उभी केली आहे. चित्रपटाच्या तांत्रिक बाजूची जबाबदारीही तितक्याच सक्षम टीमने सांभाळली आहे. कार्तिक परमार यांनी छायाचित्रण केले असून, स्मरण साई यांनी संगीत दिले आहे, तर रोहन सिंह यांनी चित्रपटाचे वैशिष्ट्यपूर्ण प्रॉडक्शन डिझाइन साकारले आहे.

भव्य दृश्यवैभव आणि गूढ आशय यांचा अनोखा संगम असलेला 'राव बहादूर' प्रेक्षकांना अशा एका जगात घेऊन जाण्यास सज्ज आहे, जिथे प्रत्येक छोट्या तपशीलामागे एखादा खोल अर्थ दडलेला असू शकतो. 'राव बहादूर' हा चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# श्री तुळजाभवानीदेवीच्या ४ हजार एकर जमीन महाघोटाळ्याची सखोल चौकशी करण्याचे महसूलमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश!

## महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पाठपुराव्याला यश

मुंबई – लाखो हिंदू भाविकांचे कुलदैवत असलेल्या तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी देवीच्या ४ हजार १२१ एकरपेक्षा अधिक इनामी जमिनीच्या अनधिकृतपणे हस्तांतरण आणि विक्री प्रकरणाची आता राज्य शासनामार्फत चौकशी केली जाणार आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिलेल्या सविस्तर निवेदनाची गंभीर दखल घेत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धाराशीवच्या जिल्हाधिकार्यांना या संदर्भात तातडीने चौकशी समिती नेमून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तत्कालीन निजाम शासनाने श्री तुळजाभवानी देवीला १ सहस्र ६६६.१४ हेक्टर म्हणजेच सुमारे ४ हजार १२१.१४ एकर जमीन इनाम म्हणून दिली होती. कायद्यानुसार या जमिनीची खरेदी–विक्री होऊ शकत नाही आणि याला 'कुळ कायदा' देखील लागू होत नाही. असे असतानाही महसूल अधिकारी आणि अन्य व्यक्तींच्या संगनमताने हजारो एकर जमीन लाटण्यात आल्याचा आरोप आहे.

श्री तुळजाभवानी संस्थानच्या नावे कागदोपत्री ३ हजार ३९७ एकर भूमी असतांना प्रत्यक्ष ताबा मात्र चार मठांमधील खाजगी व्यक्तीकडे आहे, तसेच जगदंबा न्यासाच्या नावे असलेली ४०३ एकर जमीन मुख्य न्यासाला अंधारात ठेवून थेट खाजगी व्यक्तींच्या नावे करण्यात आली. कायद्याचे उल्लंघन करून ६३.०३ एकर जमिनीपैकी काही जमीन 'संरक्षित कुळ' दाखवून अनधिकृतपणे विकण्यात आली, तर एका अव्वल कारकुनाने आपल्या अधिकाराचा गैरवापर करत २६१ एकर जमीन तब्बल ७३ खाजगी व्यक्तींच्या नावे ७/१२ वर नोंदवली. याशिवाय अपसिंगा आणि उफळा या गावांमधील १५८ एकर जमीन अनधिकृतपणे फेरफार नोंदी करून लाटण्यात आली आहे.

या प्रकरणातील सर्व संबंधितांवर तातडीने गुन्हे नोंद व्हावेत ! – सुनील घनवट, राष्ट्रीय संघटक, मंदिर महासंघ

या प्रकरणात बेकायदेशीर हस्तांतरणात सामील असलेले तत्कालीन उपजिल्हाधिकारी, विश्वस्त आणि संबंधित मोठ्या लोकांवर तातडीने गुन्हे दाखल व्हावेत, अशी महासंघाची मागणी आहे. शासनाने विशेष अधिकारांचा वापर करून सर्व अनधिकृत खरेदीखते आणि ७/१२ वरील नोंदी तत्काळ रद्द कराव्यात आणि पूर्ण १ हजार ६६६.१४ हेक्टर जमीन पुन्हा श्री तुळजाभवानी मंदिराच्या प्रत्यक्ष नियंत्रणात घ्यावी, अशी आग्रही मागणी आम्ही करत आहोत.

# वैजापूर येथील नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कामकाज सुरु

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – वैजापुर येथे नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन झाले असून या कार्यालयाचे नियमित कामकाज गट क्रमांक ७६, तळमजला,बीएसएनएल बिल्डिंग, तालुका वैजापुर येथे सुरु झाले आहे असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप निमसे यांनी कळिवले आहे. नागरिकांनी आपल्या आवश्यक शासकीय सेवा, वाहन नोंदणी, वाहन हस्तांतरण, कर भरणा, प्रवाने, लायसन्स, लायसन्स नुतनीकरण इ. आवश्यक सेवांसंबंधी कामकाजासाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

**कार्यालयाचा पत्ता** – उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, वैजापूर, गट क्रमांक ७६, तळमजला, बीएसएनएल बिल्डिंग ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर–४२३७०१. दुरध्वनी ०२४३६–२२५७५७. ई–मेल–dyrto.57-mh@mah.gov.in

# दुष्टचक्रातून कायमची सुटका... अन् पतपात्र शेतकरी !

**पुण्यश्लोक** अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी सहकार विभाग, बँका यांच्या समन्वयातून अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रातून कायमची सुटका करण्यासाठी, त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी विविध प्रकारे फायदेशीर अशा तरतुदी शासनाने या योजनेत केल्या आहेत. यापूर्वीच्या लेखात आपण दीर्घकालीन संरचनात्मक सुधारणा, योजनेला दिलेले विचारपूर्वक असे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव, शासनाचा या योजनेमागील दूरदृष्टीकोन पाहिला. आज या योजनेतील अभ्यासपूर्ण अशा तरतुदी पाहुयात.




शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकरी कल्याणाचा ३०० वर्षांपूर्वीचा आदर्श या योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकारण्यात येत आहे. संपूर्ण कर्जमुक्ती, एकवेळ समझोता आणि नियमित परतफेड करणाऱ्यास प्रोत्साहनपर लाभ ही योजनेची तीन मुख्य स्तंभ आहेत. तब्बल ३६ हजार ५८५ कोटींची राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून कायमचे बाहेर काढणारी ही योजना आहे. यातून थकबाकीदार शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होईल. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान अल्पमुदत पीक कर्ज घेतले. ज्यांची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतची थकबाकी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकीत राहिली. अशा शेतकऱ्यांना रुपये २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा थेट लाभ मिळणार आहे. यामध्ये पीक कर्जाचे पुनर्गठित, फेरपुनर्गठित मध्यम मुदत कर्जात रूपांतर झालेल्या खात्यांचाही समावेश असेल.

ज्या शेतकऱ्यांनी २०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत घेतलेल्या पीक कर्जाची मुदतीत नियमित परतफेड केली, अशा शेतकऱ्यांना रुपये ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ मिळेल. जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये याचीही काळजी सरकारने घेतली आहे. अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. पण २०२५–२६ व २०२६–२७ मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाची देखील विहित मुदतीत परतफेड करावी लागणार आहे.

सन २०२३–२४ किंवा २०२४–२५ मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले, फेडलेही. प्रत्यक्ष परतफेडीची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास किमान रुपये ५ हजार किंवा प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम प्रोत्साहनपर लाभ म्हणून दिली जाईल, अशाप्रकारे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे कामही शासन करत आहे. त्यामुळे वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन मिळेलच.

ज्या शेतकऱ्यांची एकूण थकबाकी २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनी २ लाखांवरील अतिरिक्त रक्कम बँकेत जमा केल्यास त्यांना उर्वरित रुपये २ लाखांपर्यंतच्या रकमेचा 'एकवेळ समझोता' (OTS) अंतर्गत लाभ मिळणार आहे. बऱ्याचदा कर्ज दोन लाखांपेक्षा थोडे जास्त असते आणि शेतकरी योजनेतून बाहेर पडतो. पण यावेळच्या योजनेत तसे नाही. जर तुमचे कर्ज दोन लाखांहून अधिक असेल, तर वरची अतिरिक्त रक्कम तुम्ही बँकेत भरून या योजनेत सहज सहभागी होऊ शकता. ही रक्कम बँकेत जमा करण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे, ही जढड शेतकऱ्यांना नक्कीच फायद्याची आहे. ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९' चा लाभ घेतला आहे, त्यांना या नवीन योजनेअंतर्गत रुपये ५० हजार मर्यादेपर्यंत कर्जमुक्ती किंवा OTS चा लाभ दिला जाणार आहे, हा पूर्वीच्या लाभार्थ्यांना अतिरिक्त असा दिलासाच आहे. या तरतुदी अनब अंमलबजावणीतून लाखो शेतकरी बँकिंग व्यवस्थेत पुन्हा पतपात्र बनतील. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल, ते यातून उभारी घेतील. ही केवळ कर्जमाफी नाही, तर क्षमता बांधणी आहे. तसेच शेती अर्थव्यवस्थेची संरचनात्मक सुधारणा देखील. (क्रमशः)

**– डॉ. श्याम टरके,**
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

# राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी प्रवीण बागडे यांची निवड

नागपूर, दि. २ (प्रतिनिधी) – पत्रकारिता, सामाजिक प्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार–प्रसार तसेच वंचित, शोषित आणि बहुजन समाजाच्या न्यायहक्कांसाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ज्येष्ठ पत्रकार, लेखक व सामाजिक विश्लेषक प्रवीण मोरेश्वर बागडे (नागपूर) यांची राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार–२०२६ साठी निवड करण्यात आली आहे. आंबेडकरी विचारसरणीला वाहिलेल्या दैनिक निळे प्रतीकच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक, पत्रकारिता आणि समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

हा पुरस्कार शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर, टी.व्ही. सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. दैनिक निळे प्रतीकचे मुख्य संपादक तथा निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष आयु. रतनकुमार साळवे यांनी ही निवड जाहीर केली. पत्रकारिता, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे संवर्धन आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याच्या कार्याची दखल घेऊन प्रवीण बागडे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रवीण बागडे यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक प्रश्नांवर निर्भीडपणे लेखन करत समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता तसेच आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांनी समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले आहे. राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल प्रवीण बागडे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# घरी परतणाऱ्या भंगार व्यावसायिकाची चाकू खुपसून क्रूर हत्या!

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- आपले नेहमीचे व्यावसायिक काम आटोपून रिक्षातून उतरल्यानंतर घराच्या दिशेने पायी निघालेले भंगार व्यावसायिक अब्दुल बाशिद हकीम खान यांची दोन अज्ञात गुंडांनी मांडीत चाकू खुपसून क्रूर हत्या केली. ही थरारक घटना गुरुवारी पहाटे २:३० वाजण्याच्या सुमारास शहरातील वर्दळीच्या आकाशवाणी परिसरातील पंचम बारसमोर घडली. हत्येनंतर हल्लेखोरांनी त्यांचा मोबाईल घेऊन पळ काढला. गेल्या काही महिन्यांत शहरात सर्रास घडणाऱ्या लुटमारीच्या घटना आणि पोलिसांच्या ढिसाळ गस्तीमुळे आता सामान्यांचे रस्त्यावरून रात्री सुरक्षित फिरणेही कठीण झाल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

या खळबळजनक हत्याकांडाची सविस्तर हकीकत अशी की, मयत अब्दुल बाशिद हे आपल्या पत्नी आणि चार मुलांसह शहरातील कैसर कॉलनी भागात राहत होते. गेल्या अनेक वर्षांपासून ते भंगार व्यवसाय करत होते. बुधवारी सायंकाळी ७ वाजेपर्यंत ते घरीच होते, त्यानंतर जेवण करून महत्त्वाच्या कामाचे कारण सांगत ते घराबाहेर पडले होते. प्राथमिक माहितीनुसार, ते एका व्यावसायिक कामासाठी बाहेरगावी गेले होते. रात्री २ वाजेच्या सुमारास बाहेरगाहून परतल्यानंतर ते जालना रोडवरील एस.एफ.एस. शाळेपुढे रिक्षातून उतरले आणि जिन्सीच्या दिशेने पायी जात होते. याचवेळी पंचम बारसमोर दोन अज्ञातांनी त्यांना अडवले आणि अंधाराचा फायदा घेऊन रस्त्याच्या कडेला ओढत नेऊन मारहाण सुरू केली. या



झटापटीत एका हल्लेखोराने त्यांच्या मांडीत धारदार चाकूने सपासप वार केले.

मांडीतील मुख्य रक्तवाहिनी कापली गेल्याने अब्दुल बाशिद गंभीर जखमी झाले. या रक्तबंबाळ अवस्थेतच त्यांनी रस्त्यावर धावत येत एका रिक्षाचालकाकडे वाचवण्यासाठी आर्त मदत मागितली. मात्र, त्यांच्या अंगावरून होणारा प्रचंड रक्तस्त्राव पाहून तो रिक्षाचालक घाबरला आणि त्यांना मदत न करताच तिथून निघून गेला.

दरम्यान, सुदैवाने शहरात रात्रगस्तीवर असलेल्या पोलिसांच्या 'डायल ११२' च्या कर्मचाऱ्यांनी रक्ताच्या थारोळ्यातील व्यक्ती पाहून तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वेळ न गमावता अब्दुल बाशिद यांना दुसऱ्या एका रिक्षात टाकून शासकीय घाटी रुग्णालयात दाखल केले. मात्र, शरीरातून प्रचंड रक्तस्त्राव झाल्यामुळे उपचार सुरू असतानाच पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.

अब्दुल बाशिद हे रुग्णालयात दाखल करेपर्यंत पूर्णपणे शुद्धीवर होते. शासकीय रुग्णालयात जात असताना त्यांनी रिक्षाचालकाला आपल्या मोठ्या मुलाचा मोबाईल क्रमांक तोंडी सांगून घटनेची माहिती देण्यास सांगितले होते. माहिती मिळताच त्यांच्या मुलाने आणि भावाने घाटीत धाव घेतली. हल्लेखोरांनी अब्दुल बाशिद यांच्याकडील मोठी रक्कम लुटण्याच्या उद्देशातूनच हा हल्ला केला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. हल्लेखोरांनी त्यांचा मोबाईल चोरला, मात्र खिशातील ५०० रुपयांची नोट तशीच मिळून आली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले, सहाय्यक पोलीस आयुक्त मनोज पगारे, पोलीस निरीक्षक गणेश ताठे आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी घटनास्थळाची पाहणी केली. हल्लेखोर जालना रोडच्या दिशेने पसार झाले असून, त्यांचा शोध घेण्यासाठी सिडको, एमआयडीसी सिडको, मुकुंदवाडी, जिन्सी पोलीस ठाण्यांसह गुन्हे शाखेची ४ विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

# शासकीय कर्करोग रुग्णालयात अत्याधुनिक पेट स्कॅन सेवेचा शुभारंभ



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- शासकीय कर्करोग रुग्णालयात अत्याधुनिक पेट स्कॅन सेवेचा शुभारंभ २ जुलै रोजी करण्यात आला असून, कर्करोगाच्या निदान व उपचार प्रक्रियेला यामुळे मोठी गती मिळणार आहे. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते या महत्त्वपूर्ण सेवेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. अंजली वासाडीकर, डॉ. अर्चना राठोड, डॉ. इशरत करीम, डॉ. किशोर सुलाने, डॉ. दर्पण जक्कल, डॉ. प्रभाकर जिरवनकर आणि डॉ. शुभम काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यापूर्वी शासकीय कर्करोग रुग्णालयातील रुग्णांना पेट स्कॅनसारख्या अत्यावश्यक तपासणीसाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांवर मोठा आर्थिक भार पडत होता, तसेच तपासणीसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने उपचार प्रक्रियेलाही विलंब होत असे. आता ही सुविधा शासकीय रुग्णालयातच उपलब्ध झाल्याने रुग्णांना कमी खर्चात, अधिक सुलभ आणि वेळेत तपासणीची सुविधा मिळणार आहे.

ही सेवा सुरू करण्यासाठी रुग्णालयाच्या आवारातील जुन्या नेत्र रुग्णालयाच्या इमारतीत आवश्यक बदल व बांधकाम करून आधुनिक सुविधा उभारण्यात आल्या आहेत. यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ आता सर्वसामान्य रुग्णांनाही शासकीय स्तरावर मिळू शकणार आहे.

पेट स्कॅन ही कर्करोगाचे अचूक निदान, रोगाची व्याप्ती निश्चित करणे, उपचारांचा परिणाम तपासणे आणि पुढील उपचाराची दिशा ठरविण्यासाठी अत्यंत महत्त्वाची तपासणी मानली जाते. या तपासणीद्वारे शरीरातील कर्करोगग्रस्त पेशींचा अचूक शोध घेणे शक्य होत असल्याने उपचार अधिक प्रभावी आणि वेळेत सुरू करता येतात. शासकीय कर्करोग रुग्णालयात पेट स्कॅन सेवा सुरू झाल्याने छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यातील हजारो कर्करोग रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवेच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

# महानगरपालिकेतर्फे कर वसुली मोहीम

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- सलग तिसऱ्या आठवड्यात एकाच दिवसात २६ मालमत्ता सील तर रु.६४.९१ लक्ष एवढा कर वसूल कर वसुली मोहिमेस मागील आठवड्यात मिळालेल्या प्रतिसादानंतर महापालिका आयुक्त श्री अमोल येडगे यांच्या आदेशानुसार आज दिनांक २ जूलै रोजी महापालिकेच्या सर्व १० झोन अंतर्गत पुन्हा एकदा कर वसुली मोहीम राबवण्यात आली. यात आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे व उप आयुक्त श्री विकास नवाळे यांनी सर्व १० झोन मधे प्रत्येकी १५ ते २० मोठ्या थकबाकीदारांची यादी कार्यवाहीसाठी नेमून देण्यात आली होती. त्यावर आज झोन निहाय कर वसुली पथकांनी कार्यवाही केली.

**दिवसभरात झोन निहाय पुढीलप्रमाणे कार्यवाही झाली.**

झोन १ सील मालमत्ता-१० कर वसूल निरंक
झोन २ सील मालमत्ता ४ कर वसूल रु. ५८७१२
झोन ३ सील मालमत्ता २ कर वसूल रु. १.९४ लाख
झोन ४ सील मालमत्ता १कर वसूल रु. ४.६१ लक्ष
झोन ५ सील मालमत्ता-३ कर वसूल निरंक
झोन ६ सील मालमत्ता २ कर वसूल रु. १.०० लक्ष
झोन ७ सील मालमत्ता १ कर वसूल रु. १५.५९ लक्ष
झोन ८ सील मालमता १ कर वसूल निरंक
झोन ९ सील मालमत्ता - निरंक कर वसूल १२.१९ लाख
झोन १० सील मालमत्ता २ कर वसूल रु. २९ लक्ष
**एकूण सील मालमत्ता २६ कर वसूल रु.६४.९१ लक्ष**

# अपघातानंतर आर्थिक संकटात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार; १०० वर्षीय वृद्धेला अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर

मुंबइ दि.२ (प्रतिनिधी)- गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले.

सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली.

नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला.

अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उपचारात कोणताही विलंब न होता आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली.

या आर्थिक मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सरूबाई मुंजवार यांच्या प्रकरणात अर्ज प्राप्त होताच आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण करून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती अवलंबिली जाते. गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# गणाचार्य विरागसागर महाराज यांच्या तृतीय समाधी दिनानिमित्त जालना येथे भव्य महामहोत्सव; आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज यांचे मंगल सान्निध्य लाभणार

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- बुंदेलखंडचे प्रथमाचार्य, भारत गौरव, श्रेष्ठ समाधी साधक परमपूज्य गणाचार्य श्री १०८ विरागसागरजी महामुनिराज यांच्या तृतीय समाधी दिन महोत्सवाचे भव्य आयोजन शनिवार, ४ जुलै २०२६ रोजी विराग अक्षय समाधी तीर्थ, देवमूर्ती (जालना) येथे अत्यंत श्रद्धा, भक्तिभाव आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न होणार आहे.

या पावन प्रसंगी परमपूज्य विरागांचे चिराग, चंबळचे चंदन, गुरु विरागांचे लघुनंदन, भक्तामर महोदधी उच्चारणाचार्य श्री १०८ विनम्रसागरजी महामुनिराज (२० पिच्छी ससंघ) यांचे परम मंगल सान्निध्य लाभणार आहे. त्यांच्या पवित्र उपस्थितीत होणारा हा सोहळा गुरु भक्ती, धर्मआराधना आणि आध्यात्मिक चेतनेचा अद्वितीय संगम ठरणार आहे.

या महामहोत्सवाला माजी न्यायमूर्ती कैलासचंदजी चांदीवाल, महावीरजी पाटणी (छत्रपती संभाजीनगर), फुलचंदजी जैन (छत्रपती संभाजीनगर) तसेच भूषणजी कासलीवाल (चांदवड) हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६.०० वाजता जिनाभिषेक व शांतिधाराने होईल. त्यानंतर ७.०० वाजता गुरुचरणाभिषेक शांतिधारा, ७.३० वाजता आचार्य परमेष्ठी विधान आणि ९.३० वाजता आहारचर्या संपन्न होईल. दुपारी १.३० वाजता गुरु गुणानुवाद सभा आयोजित करण्यात आली असून, त्यामध्ये गणाचार्य श्री विरागसागरजी महाराज यांच्या तप, त्याग, संयम आणि आध्यात्मिक जीवनावर श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल.

सायंकाळी ७.०० वाजता लघुनाटिका आणि ८.०० वाजता भव्य भजन संध्या यांचे आयोजन अक्षय मंगल कार्यालय, देवमूर्ती, जालना येथे करण्यात आले असून, छत्रपती सभाजीनगर सह मोठ्या संख्येने भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

बाहेरगावाहून येणाऱ्या श्रद्धाळूंसाठी निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारी ११.३० ते १.३० आणि सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत भोजनाची सुविधा उपलब्ध असेल. तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते विराग अक्षय समाधी तीर्थ या मार्गावर ये-जा करण्यासाठी विशेष वाहन व्यवस्थाही करण्यात आली आहे.

निवास व वाहन व्यवस्थेसाठी अजय पहाडे (७९७२६०३९३३) आणि दिलीप बाकलीवाल (९४२०८२९६७४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.हा भव्य धार्मिक सोहळा श्रेयांसनाथ दिगंबर जैन मंदिर समिती, विराग अक्षय समाधी तीर्थ आणि सकल दिगंबर जैन समाज, जालना (महाराष्ट्र) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे.

गणाचार्य श्री विरागसागरजी महाराज यांच्या तृतीय समाधी दिनानिमित्त आयोजित हा महामहोत्सव गुरु भक्ती, संयम, तप आणि वीतराग धर्माचा दिव्य संदेश जनमानसात पोहोचविणारा ऐतिहासिक आध्यात्मिक सोहळा ठरणार असल्याची माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल, औरंगाबाद यांनी दिली

# मुख्य अभियंता मृद व जलसंधारण यांचे कार्यालय कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर, दि.१(जिमाका)-जिल्ह्यातील मुख्य अभियंता मृद व जलसंधारण हे कार्यालय आजपासून कार्यान्वित झाले. मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांनी कार्यालयाच्या कामकाजास सुरुवात केली. मृद व जलसंधारण आयुक्त प्रतिभा इंगळे, 'वाल्मी'चे महासंचालक सुनिल कुशिरे, जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज, वाल्मी सहसंचालक सुभाष कापगाते, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेद्र कटके, जलसंधारण महामंडळाचे मुख्य लेखा परीक्षक गणेश पाटील, उपअभियंता किरण चाबुस्कवार, धोडाराम कासले, गणेश मुळे, महेश निनाळे, पवन ठरले, सह प्रादेशिक दक्षता गुण नियंत्रक कार्यलय, वाल्मी व आयुक्त कार्यालयामधील अधिकारी व कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

मृद व जलसंधारण विभागाच्या दि.२७ मे च्या शासन निर्णयानुसार मुख्य अभियंता मृद व जलसंधारण छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील ८ तसेच नाशिक प्रादेशिक विभागातील ५ असे एकूण १३ जिल्ह्यांचे असणार आहे. या कार्यालयाचे पहिले मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांची करण्यात आली आहे.आयुक्त मृद व जलसंधारण यांनी त्यांचेकडे हा पदभार देण्यात आला आहे. वाल्मी परिसर, कांचन वाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे हे कार्यालय कार्यान्वित झाले आहे.

(पान १ वरुन)

## मुंबईत मॅनहोलमध्ये पडून एकाचा ...

कोसळले. घटनेची माहिती मिळताच पालिका अधिकारी, पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पाण्याचा वेग जास्त असल्याने शेख वाहून गेल्याची शक्यता वर्तवली जात होती; शोध मोहिमेदरम्यान त्यांची छत्री आणि चप्पलही सापडली. अखेर सुमारे चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अग्निशमन दलाच्या जवानांना शेख यांना बाहेर काढण्यात यश आले, मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.

## उत्तराखंडमध्ये पावसाचा कहर;..

बागेश्वरमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केल्यामुळे, प्रशासनाने आज २ जुलै रोजी इयत्ता पहिली ते बारावीच्या सर्व शाळा आणि अंगणवाडी केंद्रांना सुट्टी जाहीर केली आहे. बागेश्वरमध्ये मुसळधार पावसामुळे डोंगरावरून मलबा रस्त्यांवर आला आहे. ढिगाऱ्यांमुळे १४ ग्रामीण रस्ते बंद झाले असून, त्यामुळे सुमारे ५० गावांचा संपर्क तुटला आहे. अनेक भागांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला आहे. रस्त्यांवरील ढिगारा हटवण्यासाठी प्रशासन जेसीबी आणि इतर यंत्रसामग्रीचा वापर करत आहे.

चमोली जिल्ह्यातील गुलाबकोटीजवळ मोठ्या ढिगाऱ्यांमुळे बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्ग बंद झाला आहे. रस्ता पुन्हा सुरू करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. बद्रीनाथमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे अलकनंदा नदीची पाणी पातळी वाढली आहे. पावसामुळे मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांची संख्या कमी झाली आहे. तथापि, दर्शन सुरू आहे. गुलाबकोटी येथे बद्रीनाथ मार्ग बंद झाल्यामुळे भाविकांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. मान्सूनच्या काळात हवामानाचा बद्रीनाथ यात्रेवर नेहमीच परिणाम होतो. किंबहुना, मुसळधार पावसामुळे विविध ठिकाणी भूस्खलनाचा धोका वाढला आहे. त्यामुळे, प्रशासन भाविकांना सुरक्षित प्रवास करण्याचा सल्ला देत आहे.

रुद्रप्रयाग जिल्ह्यातील धारी देवीजवळील शिरोबागड येथे ऋषिकेश-बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला, त्यामुळे चारधाम यात्रेला निघालेले यात्रेकरू अडकून पडले आहेत. खराब हवामानामुळे, केदारनाथसाठी चालणाऱ्या सर्व आठ हेलिकॉप्टर सेवा ५ जुलैपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. जिल्हा प्रशासनाने सांगितले की, हा निर्णय यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी घेण्यात आला आहे. हवामानाच्या परिस्थितीनुसार ही स्थगिती पुढे वाढवली जाऊ शकते.

## टीईटी पेपरफुटी प्रकरणात आणखी...

पथकामार्फत या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या प्रकरणाची व्याप्ती दिल्ली, आग्रा, बिहार आणि हरियाणापर्यंत वाढली आहे.

विजेंद्र गुप्ता हा या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणाचा मुख्य सूत्रधार असल्याची बाब याप्रकरणाच्या तपासादरम्यान निष्पन्न झाली. तो आणि त्याचा साथीदार अद्याप फरार असून त्यांचा विविध राज्यांत शोध सुरू आहे. दरम्यान, विजेंद्र गुप्ता याची पत्नी सुमनकुमारी गुप्ता (३५) हिचे नावही याप्रकरणात समोर आले.

ती फरार विजेंद्रच्या सतत संपर्कात असल्याचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) आणि आर्थिक व्यवहारांच्या तपासातून उघड झाले. त्यामुळे एसआयटीने तिला बिहारमधील पाटणा येथून अटक केली. त्यापाठोपाठ पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात ठाणे पोलिसांच्या विशेष तपास पथकाला आणखी एक मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणातील उत्तरप्रदेश येथून सोनू सिंह, मिथुन सिंह आणि कपिल दहिया या तिघांना पथकाने अटक केली. यामुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता सातवर पोहोचली आहे.

## मराठीच्या अभिजात दर्जानंतर...

भाषा विभागाने केंद्राच्या निधीची प्रतीक्षा न करता राज्यात विश्व मराठी संमेलन, वारकरी, बाल, युवा, महिला तसेच कामगार साहित्य संमेलनांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय वैश्विक मराठी भाषा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने पाच कोटी रुपये खर्च करून महाराष्ट्र मंडळाची ऐतिहासिक इमारत खरेदी केली आहे. पुढील दोन महिन्यांत हे केंद्र कार्यान्वित होणार आहे, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

हिंदुहृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, पुणे, कोल्हापूर आणि रत्नागिरी येथे मराठी भाषा विकास केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र जिल्हा भाषा अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी एका महिन्यात करण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

## मराठी बालभारतीच्या ६ वीतील...

प्राथमिक स्तरावर महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीची अधिक व्यापक ओळख करून देणे आवश्यक होते. प्रत्येक विभागानुसार लोकनृत्याचा समावेश करता आला असता. मात्र, तसे झाले नसल्याने रिजॉइंडर जोडून पाठ्यपुस्तकात सुधारणा करावी अशी मागणी जेष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून केली आहे.

या धड्याला घेऊन राज्य शैक्षणिक संशोधन परिषद व भालभारती यांना देखील याचा खुलासा केला नसल्याने, त्यावर देखील त्यांनी आक्षेप नोंदविला आहे. यापूर्वीही इयत्ता तिसरीच्या पुस्तकात भिडेवाड्याचा उल्लेख ''महाराष्ट्रातील पहिली शाळा'' असा करण्यात आल्याने वाद निर्माण झाला होता. इतिहासानुसार भिडेवाडा ही देशातील पहिली मुलींची शाळा असल्याचा आक्षेप नोंदवण्यात आला होता. त्यानंतर बालभारतीने संबंधित मजकुरात दुरुस्ती करण्याची घोषणा केली होती. आता, लोकनृत्याच्या धड्यामुळे पुन्हा एकदा बालभारतीच्या अभ्यासक्रमाला घेऊन राज्य सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## विद्यार्थ्यांना शाळेतूनच पुस्तकांची...

यावर्षी पार पडलेल्या इयत्ता १० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षांमध्ये सामूहिक कॉपी आणि इतर गैरप्रकार घडल्यामुळे १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी सर्वाधिक प्रकरणे ६५० ही अमरावतीची आहेत तर सर्वाधिक ५०१ प्रकरणे संभाजी नगर विभागातील आहे. १२ वी परीक्षेदरम्यान विविध केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकाराप्रकरणी एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात अमरावती विभागात ८, नागपूर विभागात ३, छत्रपती संभाजीनगर विभागात ३, लातूरमध्ये १ अशी नोंद आहे. २०२६ मध्ये १२ वी परीक्षेच्या दरम्यान सामूहिक कॉपीची एकूण १ हजार ४६९ प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत, अशी माहिती मंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरातून दिली.

## कोठडीतील मृत्यू प्रकरणी...

पोलिसांनी बेग्याला पोलिस कोठडीत बेदम मारहाण केली. या अमानुष मारहाणीमुळे दुसऱ्याच दिवशी म्हणजेच १० मे २०११ रोजी बेग्या पवारचा कोठडीतच मृत्यू झाला.

या मृत्यूमुळे निर्माण झालेला तणाव पाहता, शासनाने या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवला होता. सीआयडीच्या पथकाने ३४ दिवस सखोल तपास करून दोषी पोलिसांवर खुनाच्या गुन्ह्यासह विशेष ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. अखेर तब्बल १५ वर्षे, १ महिना आणि २३ दिवसांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढ्यानंतर पीडित कुटुंबाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे.

# शेतकरी हिताला प्राधान्य देणारी कर्जमुक्ती...

राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी करणारी घोषणा केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ या अंतर्गत निसर्गाची सर्व रुपे झेलत शेतात राबून आपल्यासाठी अन्न धान्य उत्पादन करणाऱ्या बळीराजाला वेगवेगळ्या संकटांना सामोरे जावे लागते. या बळीराजाला समर्पित अशी ही सर्वात मोठी कर्जमाफी आहे.

आपला देश मौसमी हवामानाच्या प्रदेशात आहे आणि बदलते ऋतूचक्र आणि वेळोवेळी येणारी नैसर्गिक आव्हाने झेलत शेती करणे अतिशय कष्टाचे काम आहेच सोबतच लहरी निसर्गाने अवेळी येणारा पाऊस, अतिवृष्टी तर कधी गारपीट याने पेरलं ते उगवलं तरी त्याला बाजारपेठ मिळणं व योग्य भाव मिळणं यांच संकट त्याच्यासमोर असतं. सतत तणाव सहन करीत शेतकरी मेहनत करीत असताना आणि त्याच्या कष्टाचं मोल जाणून कर्जमुक्तीची योजना शासनाने आणली आहे.

शासनाने याबाबत जे निकष लावले आहेत ते जाणून घेणे महत्वाचे आहे. यात कर्जमुक्तीची व्याप्ती अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा अशीच ठेवण्यात आली आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग या विभागांकडे याची अंमलबजावणी सोपविण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतर पध्दतीने अर्थात डीबीटी अंतर्गत याचा लाभ मिळणार आहे.

दोन लाख किंवा त्यापेक्षा कमी कर्ज असेल तर त्या शेतकऱ्याला त्याच्या बँक खात्यात कर्जाची थकीत रक्कम थेट लाभ स्वरुपात प्राप्त आहे. यासाठी त्याचे बँक खाते आणि आधार क्रमांक संलग्न असणे आवश्यक आ हे. जे शेतकरी नियमितपणे कर्जाचा हप्ता बँकेत नियमितपणे भरतात त्या सर्वांना प्रोत्साहन देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे त्यानुसार अशा शेतकरी बांधवांना त्यांच्या बँक खात्यात ५० हजार रुपये प्रोत्साहन स्वरुपात दिले जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर सातत्याने शेतकरी केंद्रस्थानी ठेवत अने महत्वाचे निर्णय घेतले आहेत. आणि त्यासाठी विशेष योजना तयार करुन त्याची व्यवस्थित अंमलबजावणी होवून याचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा असे प्रयत्न केले आहेत. आजवरच्या धोरणात्मक निर्णयामध्ये हा कर्जमुक्तीचा निर्णय शेतकऱ्यांना संकटातून सावरण्यास मदत तर करणार आहेच सोबतच यातून नवी वाट त्यांना मिळेल याचाही या निर्णयात विचार झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे. यालाही विशेष महत्व आहे. लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन आणि ग्रामीण विकासाचा विचार करणाऱ्या आणि शेतकरी हितासाठी काम करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्षात हा निर्णय घेण्यात आला याला विशेष महत्व आहे.

**- प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६६